

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▮ अंक ४३ ▮ गुरुवार ५ नोव्हेंबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

ऊस दराबाबत कारखान्यांनी आठवडाभरात निर्णय घ्यावा - ना.विखे पाटील

शेतकरी संघटना आणि कारखाना प्रतिनिधी समवेत प्रथमच बैठक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांबाबत बैठक घेऊन येत्या ९ नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार साखर कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी तातडीने करण्यात येणार असून, त्यासाठी तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात येईल. या तपासणीवेळी शेतकरी अथवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित राहतील. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामातील ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींकडून विविध समस्या व ▮ पान ४ वर

अहिल्यानगरमध्ये १२ ते १८ नोव्हेंबर दरम्यान

श्री शिवमहापुराण कथा व ११,००० रुद्राक्ष वाटपाचा दिव्य सोहळा!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– ''पुढच्या पिढीला संपत्तीच नाही, तर संस्कारांचाही वारसा देऊया!'' या उदात्त आणि विचारप्रवर्तक हेतूने अहिल्यानगर शहरात एका भव्य आणि दिव्य अशा श्री शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, शहरात या निमित्ताने श्रद्धेचा संगम आणि भक्तीचा एक मोठा उत्सव साजरा होणार आहे.

कथेचे ठिकाण व वेळ:
सदर कथा सोहळा मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२६ या सप्ताहाच्या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत डि.एड. कॉलेज मैदान, सातभाई मळा, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे हा कार्यक्रम अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न होईल.

सुप्रसिद्ध कथाप्रवक्ते:
या कथेसाठी श्रीरामकृष्ण परमहंस सेवा प्रतिष्ठान (केज, जि. बीड) चे सुप्रसिद्ध कथाप्रवक्ते ह.भ.प. समाधानजी महाराज शर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या सुमधुर आणि ओघवत्या वाणीतून उपस्थित भाविकांना भगवान शिवाच्या अगाध महिमाचे, जीवनमूल्यांच्या शिकवणीचे आणि भक्तीच्या अनमोल अनुभवाचे श्रवण करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

११,००० पंचमुखी रुद्राक्षांचे वाटप:
या सोहळ्याचे एक प्रमुख आणि विशेष आकर्षण म्हणजे, याप्रसंगी उपस्थित भाविकांना तब्बल ११,००० पंचमुखी रुद्राक्षांचे वाटप करण्यात येणार आहे. या माध्यमातून घराघरात शिवभक्तीचा आणि भारतीय संस्कारांचा संदेश पोहोचवण्याचा संयोजकांचा मानस आहे.

दररोज महाप्रसादाचे आयोजन:
केवळ श्रवणभक्तीच नाही, तर दररोज कथेनंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचेही उत्तम नियोजन करण्यात आले आहे, जेणेकरून प्रत्येक भाविक प्रसादाचा लाभ घेऊ शकेल.



निमंत्रकांचे आवाहन:
सध्याच्या काळात तरुण पिढीवर योग्य संस्कार होणे अत्यंत गरजेचे आहे. याच उद्देशाने आयोजित केलेल्या या शिवमहापुराण कथेला अहिल्यानगर शहर व परिसरातील सर्व भाविकांनी, आबालवृद्धांनी आपल्या मुलांसह आणि संपूर्ण कुटुंबाने मोठ्या संख्येने अवश्य उपस्थित राहावे. भगवान शिवाच्या भक्तीचा आणि संस्कारांचा हा अनमोल ठेवा पुढच्या पिढीला देण्यासाठी या सोहळ्यात सर्वांनी सहभाग नोंदवावा, असे नम्र आवाहन या कार्यक्रमाचे निमंत्रक, अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर तथा साईद्वारका सेवा ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय कृष्णाभाऊ जाधव यांनी केले आहे.

पदांची शिखरे सर करतानाच सामान्य माणसाशी नाळ कायम

जिल्हा बँकेतील दमदाट एंट्रीने खा. लंकेंच्या संघटनशक्तीचा पुन्हा प्रत्यय!

दैनिक आकर्षण । संतोष कोरडे

पारनेर– राजकारणात अनेक जण मोठी स्वप्ने पाहतात; काही जण पदे मिळवतात, तर काही जण आपल्या कामाच्या जोरावर जनतेच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. खासदार डॉ. नीलेश लंके हे अशाच नेतृत्वशैलीचे नाव! सरपंचपदापासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदारकी, खासदारकी आणि आता अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदापर्यंत येऊन पोहोचला आहे. कमी वयात एवढी पदे आणि एवढा मोठा राजकीय प्रवास घडवणे ही निश्चितच सोपी गोष्ट नाही. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी झालेली त्यांची निवड ही त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील आणखी एक महत्त्वाची भर आहे. जिल्हा बँक म्हणजे शेतकरी, सोसायट्या, दूध उत्पादक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार. या सहकार क्षेत्रात त्यांनी दमदार एन्ट्री केली आहे. लंके यांची जिल्हा बँकेवर निवड होणे हा प्रस्थापितांना मोठा धक्का आहे. राजकीय क्षेत्रातील संघटनशक्तीचा उपयोग आता सहकार क्षेत्रात किती प्रभावीपणे होतो, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



संतोष कोरडे
दैनिक आकर्षण
उपसंपादक
९६३७६३३८७८



सुख-दुःखात धावून जाणारे नेतृत्व

खासदार लंके यांची एक वेगळी ओळख म्हणजे ते केवळ राजकीय कार्यक्रमांपुरते मर्यादित राहत नाहीत. सामान्य माणसाच्या सुख-दुःखात सहभागी होणे, अडचणीच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि शक्य तिथे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये मानली जातात. त्यामुळे त्यांचा सर्वसामान्य कुटुंबांशी थेट संपर्क निर्माण झाला आहे. राजकारणात पदापेक्षा माणसांशी जोडलेले नाते अधिक महत्त्वाचे असते, याची जाणीव त्यांच्या कार्यातून दिसून येते.

तरुणांची फौज आणि मजबूत संघटन

लंके यांच्या पाठीशी असलेली तरुणांची मोठी फळी ही त्यांच्या राजकीय ताकदीची महत्त्वाची बाजू आहे. गावोगावी कार्यकर्त्यांचे जाळे, प्रत्येक भागात संपर्क आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी तत्पर असणारी कार्यकर्त्यांची टीम यामुळे त्यांची संघटन बांधणी अधिक मजबूत झाली आहे. एखाद्या सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला एखादे काम घेऊन त्यांच्यापर्यंत पोहोचायचे असेल, तर या संघटनशक्तीच्या माध्यमातून संपर्क आणि पाठपुरावा करणे तुलनेने सोपे होते. गोरगरीब नागरिकांची कामे मार्गी लावण्यासाठी कार्यकर्त्यांची ही फळी महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते.

संघर्षातून उभे राहिलेले नेतृत्व

आज दिसणारी पदांची उंची गाठण्यासाठी खा. लंकेंना संघर्षाचे अनेक टप्पे पार करावे लागले आहेत. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या व्यक्तीने राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करणे, कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन करणे आणि जनतेशी सातत्याने संपर्क ठेवणे यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागते. लंके यांच्या राजकीय प्रवासात संघर्ष, जिद्द, लोकसंपर्क आणि संघटन कौशल्य या गोष्टी ठळकपणे दिसतात.

कपाशीच्या शेतात गांजाची लागवड!

मिरजगाव पोलिसांचा छापा; तब्बल ३१ लाखांचा गांजा जप्त, एकाला अटक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– कर्जत तालुक्यातील गुरवपिंप्री येथे कपाशीच्या शेतात लपवून गांजाची लागवड मिरजगाव पोलिसांनी उघड केली आहे. या कारवाईत तब्बल ३१ लाख ८२ हजार ७५० रुपये किमतीचा ६३ किलोपेक्षा अधिक गांजा जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी एकाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगर जिल्हा अंमली पदार्थ मुक्त करण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी कारवाईचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, बुधवारी (दि. ४) रात्री साडेआठच्या सुमारास मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि विजय झंजाड आणि त्यांचे पथक हद्दीत पेट्रोलिंग करत होते. यावेळी गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना माहिती मिळाली की, गुरवपिंप्री (ता. कर्जत) येथे एका व्यक्तीने आपल्या कपाशीच्या शेतात गांजाची लागवड केली आहे.

या माहितीची खात्री करून उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (कर्जत) आणि मिरजगाव पोलिसांनी तात्याराम भिकाजी गावडे (रा. गावडेवाडी, गुरवपिंप्री, ता. कर्जत) याच्या घराजवळील कपाशीच्या शेतात संयुक्त छापा टाकला. या छाप्यात पोलिसांना कपाशीच्या झाडांमध्ये लपवून लावलेली गांजाची झाडे मिळून आली.

या कारवाईत पोलिसांनी एकूण ६३ किलो ६५५ ग्रॅम वजनाचा आणि ३१ लाख ८२ हजार ७५० रुपये ▮ पान ४ वर

केडगावच्या पाणीप्रश्नासाठी नगरसेवक मनोज कोतकर यांनी धरले अधिकाऱ्यांचे पाय

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करा; जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा । कोतकर यांची महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– शहरातील सर्वांत मोठे उपनगर असलेल्या केडगावमधील विस्कळीत पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करून त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर यांनी केली आहे. नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे आक्रमक भूमिका घेत अधिकाऱ्यांचे पाय धरून लक्ष वेधले.

केडगाव हे अहिल्यानगर शहरातील सर्वांत मोठे उपनगर असून, या भागात मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास आहेत. तसेच उपनगराचा नव्याने विस्तार होत असल्याने शेवटच्या घटकापर्यंत पाणी वितरण व्यवस्था पोहोचविणे आवश्यक आहे. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून केडगावमधील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, अनेक भागांत कमी दाबाने पाणी येत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. केडगावमध्ये नियमितपणे चार दिवसांनी पाणीपुरवठा होणे आवश्यक असून, त्यासाठी महापालिकेने योग्य नियोजन करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कोतकर यांनी केली.

केडगाव उपनगरातील ज्या भागांमध्ये अद्याप पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइन पोहोचलेल्या नाहीत, त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आगामी काळातील पाणीटंचाईचा विचार करून महापालिकेने आतापासूनच नियोजन करणे गरजेचे आहे. नागरिकांना नियमित व पुरेशा दाबाने पाणी मिळेल, यासाठी वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवावे, असेही कोतकर यांनी नमूद केले. केडगाव उपनगर महानगरपालिका हद्दीत असले तरी या भागात मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग वास्तव्यास आहे. अनेक शेतकरी शेतीबरोबरच जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करतात. ▮ पान ४ वर

जिल्हा बँकेचा फक्त उत्तरेसाठी वापर करतात

नीलेश लंके, प्रताप ढाकणे, शिवाजीराव काकडे यांचा आरोप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– जिल्हा सहकारी बँकेवर विशिष्ट भागातील मोजक्या लोकांचा ताबा आहे. बँक शेतकऱ्यांची आहे असे सांगतात आणि बँकेच्या पैशाचा ठरावीक १२ कारखानदार वापर करतात. या कारखानदारांनी सर्व नियम मोडून ३ हजार कोटीचे कर्ज घेतले आणि ते थकवले आहे. जिल्हा बँकेचा फक्त उत्तरेसाठी वापर होतोय. सर्वच बाबतीत दक्षिण भागाचा केवळ वापर केला जात आहे असा आरोप खासदार निलेश लंके, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रताप ढाकणे, शिवसेना नेते ॲड. शिवाजीराव काकडे व जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हर्षदा काकडे यांनी केला. थकवलेल्या नियमबाह्य कर्जाची वसुली करा आणि मग जिल्हा बँकेचे विभाजन करा, त्याशिवाय दक्षिणेतील सामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही अशी मागणीही यावेळी ॲड. शिवाजीराव काकडे यांनी केली.

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीनंतर बुधवार दि. ४ रोजी खासदार निलेश लंके, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रताप ढाकणे, शिवसेना नेते ॲड. शिवाजीराव काकडे व जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हर्षदा काकडे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. जिल्हा सहकारी बँकेत मी एकदा संचालक म्हणून आमच्यातून निवडून आलो असलो तरी सगळ्यांना पुरुन उरेल असे सांगत नीलेश लंके व प्रताप ढाकणे यांनी निशाना साधला. ते म्हणाले, आम्ही कोणतेही नियमबाह्य काम बँकेत होऊ देणार नाही. १२ साखर कारखानदारांनी नियमाची मोडतोड करुन २८५० कोटीचे कर्ज घेतले आहे. राहुरी कारखाना चालवायला घेतल्यावर हातउसणे पैसे घेतात तसे जिल्हा बँकेतुन ३०० कोटी रुपये घेतले. बँक शेतकऱ्याची आहे म्हणता आणि कारखानदारांना पोसण्यासाठी वाट्टेल त्या बाबी करुन सगेसोयरे बँकेत आनता. बँकेची निवडणूक यांना बिनविरोध करायचीच नव्हती, दुष्काळाचे निमित्त सागून बिनविरोधचा एक ड्रामा होता. बिनविरोध करायला आमचा विरोध नव्हता. मात्र समिती करुन एकनाथ शिंदे यांच्या वतीने दोन व राष्ट्रादी कॉग्रेस शरद पवार पक्षाचे कोणतेही दोन उमेदवार घ्या अशी आमची मागणी होती. मात्र त्यांना मुळात हे करायचेच नव्हते. आम्ही रिंगणात उतरवलो म्हणून तरी वीस वर्षानंतर जिल्ह्यातील लोकांना निवडणूक कळली. अनेकांनी तसे बोलून दाखवले आहे. चिड व्यक्त करायला लोकांना संधी मिळाली. खरे तर घेतलेल्या कर्जाचे पाप झाकण्यासाठीच दुसऱ्या कोणाला बँकेत येऊ द्यायचे नव्हते.

जिल्हा बँकेतील चुकीच्या कामाला विरोधच करणार आहे. नियमबाह्य घेतलेले कर्ज वसुल करावे अशी आमची मुळ मागणी आहे. जिल्हा बँकेतील बोगस नोकर भरतीची फाईल कुठे आहे याचा शोध घेऊन कारवाईची मागणी करणार आहे. लंके बँकेत गेल्याने आम्ही शेतकऱ्यांसाठी काम करणार आहोत. लंके खासदार झाल्यापासून अजूनही काहींना झोपा येईनात असा टोला यावेळी प्रताप ढाकणे यांनी मारला.

▮ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

दुष्काळाच्या झळा आता कवितेतून व्यक्त! अहिल्यानगरच्या काव्य लेखन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर- दुष्काळाची कारणे, त्याचे भीषण परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याविषयी समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या काव्य लेखन स्पर्धेला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दुष्काळाच्या वेदना, पाणीटंचाईचे वास्तव आणि जलसंवर्धनाचे महत्त्व कवींनी आपल्या कवितांमधून प्रभावीपणे मांडले. या स्पर्धेत वाघुंडे (ता. पारनेर) येथील संदीप रासकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला व्यासपीठ मिळावे, तसेच साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.स्पर्धे साठी 'दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी' हा विषय देण्यात आला होता. यामध्ये दुष्काळामागील कारणे, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व अशा विविध विषयांवर कवींनी आपल्या भावना कवितेतून व्यक्त केल्या. जिल्ह्यातील अनेक कवींनी सहभाग नोंदवित दर्जेदार कविता सादर केल्या. या स्पर्धेत संदीप रासकर (वाघुंडे, ता. पारनेर) यांनी प्रथम क्रमांक, त्र्यंबकराव ऊर्फ बाळासाहेब देशमुख (केडगाव) यांनी द्वितीय क्रमांक, तर रुपचंद शिदोरे (पाथर्डी) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी अहिल्यानगर येथील धोंडीराम खांडेकर यांची निवड करण्यात आली. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना राज्यस्तरीय नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२६ मध्ये अनुक्रमे एक हजार, पाचशे आणि तीनशे रुपये रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.

आधार आपुलकी महिला सदस्यांचा हातच्या दिवाळी फराळाला 'परिपूर्ण'चे व्यासपीठ!



अहिल्यानगर - महिलांच्या हाताला काम, त्यांच्या पाककलेला बाजारपेठ आणि कष्टांना योग्य मोबदला मिळावा, या सामाजिक उद्देशातून आधार आपुलकी फाउंडेशनने सुरू केलेल्या 'परिपूर्ण' उपक्रमांतर्गत यंदा दिवाळी फराळ निर्मितीचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. घरगुती चवीचा, पारंपरिक पद्धतीने तयार केलेला आणि आपुलकीचा गोडवा जपणारा दिवाळी फराळ तयार करण्यासाठी फाउंडेशनच्या महिला सभासद पुढे आल्या असून, त्यांच्या कौशल्याला आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे. आधार आपुलकी फाउंडेशनने वर्षभरापूर्वी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी 'परिपूर्ण इंडस्ट्रीज प्रा. लि.' या संकल्पनेला मूर्त स्वरूप दिले. संस्थेच्या सभासदांमध्ये अनेक महिला विविध खाद्यपदार्थ उत्कृष्ट पद्धतीने तयार करतात. मात्र, त्यांच्याकडे कौशल्य असूनही उत्पादनांच्या विक्रीसाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध नसते. ही अडचण लक्षात घेऊन अशा महिलांनी तयार केलेले खाद्यपदार्थ संस्थेच्या माध्यमातून खरेदी करणे आणि तेच पदार्थ ग्राहकांना वाजवी दरात उपलब्ध करून देणे, अशी या उपक्रमाची संकल्पना आहे. त्यामुळे महिलांना रोजगार व उत्पन्नाचे साधन मिळण्याबरोबरच त्यांच्या कौशल्याला हक्काची बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यंदाच्या दिवाळी फराळ निर्मितीमध्ये संस्थेच्या सभासद सौ. स्मिता साठये आणि श्रीमती प्रतिभा साबळे यांनी पुढाकार घेतला आहे.

जगातील सर्वात मोठ्या युरॉलॉजी परिषदेत

अहिल्यानगरच्या डॉ. स्वानित देशपांडे यांची निवड

भारतातील एकमेव अँड्रोलॉजिस्ट म्हणून सादरीकरणाची इटली येथे संधी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– फ्लॉरेन्स येथे ११ ते १४ नोव्हेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या इंटरनॅशनल युरॉलॉजी सोसायटी(एसआययु) च्या ४६व्या आंतरराष्ट्रीय युरॉलॉजी परिषदेत अहिल्यानगर येथील प्रख्यात युरॉलॉजिस्ट व अँड्रोलॉजिस्ट डॉ. स्वानित देशपांडे यांची व्याख्यानासाठी निवड झाली आहे. या परिषदेत आयोजित ग्लोबल अँड्रोलॉजी फोरमच्या विशेष परिसंवादात सहभागी होण्यासाठी निवड झालेले ते भारतातील एकमेव अँड्रोलॉजिस्ट आहेत.



ही जगातील सर्वात मोठी युरोलॉजी /मूत्रविकार परिषद आहे . जगभरातील युरॉलॉजी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संशोधक एकत्र आणणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत आधुनिक उपचारपद्धती, संशोधनातील प्रगती आणि पुरुषांच्या प्रजनन आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

डॉ. देशपांडे हे फ्लॉरेन्स येथे ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या परिसंवादात या विषयावर आपले व्याख्यान सादर करण्यास निमंत्रित केले आहे.पुरुषांच्या प्रजनन संस्थेतील सहायक ग्रंथींशी संबंधित संसर्ग किंवा दाह. पुरुष वंध्यत्वाच्या निदानामध्ये या समस्यांकडे इटलीतील तपासणीमध्ये अधिक शास्त्रीय आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची गरज अधोरेखित होणार आहे.डॉ. स्वानित देशपांडे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून () एम.सीएच. युरॉलॉजी पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. ते अहिल्यानगर येथील देशपांडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि गुडन्यूज आयव्हीएफ सेंटर येथे युरॉलॉजी व अँड्रोलॉजी क्षेत्रात कार्यरत आहेत. पुरुष वंध्यत्व, शुक्राणूंच्या गुणवत्तेचे मूल्यमापन, मायक्रोसर्जिकल व्हेरिकोसीलेक्टॉमी, मायक्रो-टीईएसई आणि पुरुषांच्या प्रजनन आरोग्याशी संबंधित आधुनिक उपचारपद्धती हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे विषय आहेत.

या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतातील पुरुष वंध्यत्वविषयक संशोधन आणि प्रत्यक्ष रुग्णसेवेतील अनुभव मांडण्याची संधी मिळाल्याने अहिल्यानगरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

कसे पाहावे, लक्षणे नसतानाही संभाव्य दाह किंवा संसर्ग कसा ओळखावा आणि योग्य रुग्णांमध्ये उपचारांचे महत्त्व काय, यावर ते स्वतः चे संशोधन सादर करणार आहेत .

या सादरीकरणात डॉ. देशपांडे आपल्या संशोधनाचा अनुभव मांडणार आहेत. या अभ्यासातून पुरुष वंध्यत्वाच्या

राहुल गांधींना पुढील निवडणुकीतही विरोधी पक्षात बसण्याची तयारी ठेवावी लागेल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– १ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्लीतील रस्ते रक्ताने लाल झाले होते. हजारो शीख बांधवांची निर्घृण हत्या करण्यात आली, घरे जाळण्यात आली, कुटुंबे उद्ध्वस्त झाली, मुले अनाथ झाली आणि कित्येक महिला विधवा झाल्या. त्या वेदनादायक नरसंहाराच्या जखमा आजही शीख समुदायाच्या मनात ताज्या आहेत. मात्र, इतिहासातील या काळ्या अध्यायातून धडा घेण्याऐवजी राहुल गांधी आणि काँग्रेसने पुन्हा एकदा असा निर्णय घेतला, ज्यामुळे पीडित कुटुंबांच्या भावना दुखावल्या गेल्या. शीख नरसंहाराच्या स्मृतिदिनाच्या काळात दिल्लीत रॅली आणि आंदोलनाचे आयोजन! अखेर काँग्रेसला राजकीय शक्तिप्रदर्शनासाठी हाच दिवस का निवडावा लागला?

चंदीगड प्रशासनाच्या २५८ कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रमादरम्यान केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस, राहुल गांधी आणि इंडी आघाडीच्या राजकारणावर जोरदार हल्लाबोल केला. आधुनिक भारताचे चाणक्य अमित शाह यांनी यावेळी चंदीगडच्या विकासाप्रती मोदी सरकारची वचनबद्धता अधोरेखित केली. तसेच १९८४ च्या शीख नरसंहाराची आठवण करून देत काँग्रेसला तिच्या भूतकाळातील आणि वर्तमानातील राजकारणाचा आरसा दाखवला.

तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांचे जेव्हा मोठे झाड कोसळते, तेव्हा पृथ्वी हादरते हे विधान आजही पीडितांच्या जखमांवरची खपली काढणारे ठरते. विशेष म्हणजे, त्याच राजीव गांधी यांचे पुत्र राहुल गांधी यांनी शीख नरसंहाराच्या स्मृतिदिनाच्या काळात दिल्लीत मोठ्या राजकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेऊन १९८४ च्या दंगलींच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. मोहब्बत की दुकान सुरू करण्याचा दावा करणाऱ्या काँग्रेसच्या या निर्णयामुळे तिच्या घोषणा आणि प्रत्यक्ष राजकीय वर्तन यातील फरक पुन्हा एकदा समोर आला आहे.



शाह यांचा स्पष्ट संदेश होता आणि हे वास्तव आहे की, राहुल गांधी यांना पंतप्रधान होण्याची इच्छा असेल, तर त्यांनी संपूर्ण आयुष्य मॉक पार्लमेंटमध्ये घालवावे, कारण निवडणुकीच्या राजकारणात त्यांच्या यशाची शक्यता दिसत नाही. दिल्लीत सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला एकही जागा जिंकता न येणे, हे पक्षाच्या सध्याच्या राजकीय स्थितीचे चित्र स्पष्ट करते. देश पाहत आहे की, संसदेचे कामकाज बाधित करणे, सभागृहातील मुद्दे रस्त्यावर आणून गोंधळ घालणे आणि नकारात्मक राजकारणाला प्राधान्य देणे, ही काँग्रेसची राजकीय रणनीती बनली आहे. अशा परिस्थितीत राहुल गांधी यांना पुढील निवडणुकीतही विरोधी पक्षात बसण्याची तयारी ठेवावी लागेल.


आता प्रश्न असा उपस्थित होतो की, १९८४ च्या पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी नेमके कोणी काय केले? १९८४ च्या पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या बाबतीत मोदी सरकारची कामगिरी काँग्रेसच्या सत्ताकाळापेक्षा वेगळी असल्याचे कोणाला माहीत नाही? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दंगलींशी संबंधित जुन्या प्रकरणांची पुन्हा चौकशी सुरू करण्याच्या दिशेने पावले उचलण्यात आली. पीडित कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आणि दोषींविरोधातील कायदेशीर कारवाई पुढे नेण्यात आली. शीख समुदायाला न्याय मिळवून देण्यासाठी मोदी सरकारच्या नेतृत्वाखाली आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली उचलण्यात आलेली पावले या दिशेने महत्त्वपूर्ण ठरली आहेत.

अंत्योदयाचे राजकारण करणारे अमित शाह यांनी चंदीगडमध्ये मोदी सरकारचा व्यापक विकासाचा अजेंडाही मांडला. कलम ३७० रद्द करणे, तिहेरी तलाकची प्रथा समाप्त करणे, नक्षलवादाविरोधात निर्णायक कारवाई करणे आणि ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत पंजाबसह संपूर्ण देशाला नशामुक्त करण्याचा संकल्प, या सरकारच्या प्राधान्यक्रमांमध्ये समाविष्ट आहेत. देशात ११ लाख कोटी रुपयांची पायाभूत सुविधा विकासकामे, गरीबांना मोफत रेशन, वीज, शौचालये आणि बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणे, हा याच विकासदृष्टीचा भाग आहे. यासोबतच महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा संकल्पही सरकारची वचनबद्धता दर्शवतो.

एकंदरीत, एका बाजूला १९८४ च्या शीख नरसंहारासारख्या संवेदनशील मुद्द्यावर काँग्रेस आणि राहुल गांधी यांचे राजकारण प्रश्नांच्या घेऱ्यात आहे, तर दुसऱ्या बाजूला शीख समुदायाला न्याय मिळवून देण्यापासून ते देशाला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याच्या प्रयत्नांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि गृहमंत्री अमित शाह यांची रणनीतिक भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे.

अमेरिकेत अहिल्यानगरच्या माही सिनारे यांचा क्रिकेटमध्ये डंका!

युनिव्हर्सिटी ऑफ टोलेडोच्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट गोलंदाजाचा बहुमान; दोन वेळा सामनावीर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– परदेशात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत अहिल्यानगरचे युवा क्रिकेटपटू माही सिनारे यांनी अमेरिकेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ टोलेडो येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेत प्रभावी गोलंदाजी आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्यांनी विविध वैयक्तिक पुरस्कारांवर आपले नाव कोरले. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचावली असून, त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या स्पर्धेत माही सिनारे यांनी आपल्या गोलंदाजीतील अचूकता, चपळता आणि सामन्याची परिस्थिती ओळखून खेळण्याच्या कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांसमोर आव्हान निर्माण केले. त्यांच्या प्रभावी कामगिरीची दखल घेत त्यांना दोन सामन्यांमध्ये 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट गोलंदाजी केल्याबद्दल त्यांना 'स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाज' हा बहुमान मिळाला. विशेष म्हणजे स्पर्धेतील सर्वाधिक मौल्यवान खेळाडू अर्थात 'एमव्हीपी' क्रमवारीत त्यांनी द्वितीय स्थान पटकावले. एकाच स्पर्धेत तीन महत्त्वपूर्ण वैयक्तिक पुरस्कारांची कमाई करणे ही त्यांच्या सातत्यपूर्ण खेळाची पावती मानली जात आहे.

माही यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे, क्रिकेटप्रती असलेल्या समर्पणाचे आणि जिद्दीचे फलित आहे. अमेरिकेसारख्या देशात क्रिकेट स्पर्धेत आपल्या गुणवत्तेची छाप पाडणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या यशाबद्दल छत्रपती फाउंडेशन अमेरिका यांच्या वतीने त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. तसेच भविष्यातही त्यांनी क्रिकेटच्या माध्यमातून अशीच उत्तुंग भरारी घेत अहिल्यानगरचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

संत आसाराम बापू यांच्या प्रकृतीची चिंता; तातडीने उपचारांची व्यवस्था करण्याची मागणी

श्री योग वेदांत सेवा समिती, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान व अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जोधपूर येथील केंद्रीय कारागृहात मागील सुमारे १३ वर्षांपासून बंदिस्त असलेले ८७ वर्षीय संत श्री आसाराम बापू यांची प्रकृती गंभीर असून, त्यांना तातडीने योग्य वैद्यकीय उपचार व आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी श्री योग वेदांत सेवा समिती, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संत आसाराम बापू हे ८७ वर्षांचे असून अनेक गंभीर व दीर्घकालीन आजारांनी त्रस्त आहेत. त्यांना अलीकडेच गंभीर स्वरूपाचा हृदयविकाराचा झटका आल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबीय, अनुयायी आणि हितचिंतकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.त्यांना जोधपूर येथील आरोग्यम हॉस्पिटलमध्ये तातडीने उपचारासाठी दाखल करण्याची व्यवस्था करावी. तसेच केंद्रीय कारागृहात त्यांना आवश्यक वैद्यकीय सेवा, औषधोपचार आणि दैनंदिन जीवनासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. माननीय



न्यायालयाच्या आदेशांचे प्रभावी पालन करून त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. एका ज्येष्ठ व गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तीचे जीवन, आरोग्य, उपचार आणि मानवी प्रतिष्ठा जपणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शहरप्रमुख देविदास मुदगल, बापू ठाणगे, अखिल भारतीय छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्ष सुरेखा सांगळे, श्री योग वेदांत सेवा समितीचे उपाध्यक्ष भगवान गवळी,सुरज रवे, दत्ताभाऊ वामन, अनुराधा मुंढे, संगीता ठुबे, जया म्याना, वैशाली कुलकर्णी, सोनाली नवसुपे, सूर्यमाला नवसुपे, उषा ढोकणे, निलेश बगळे, बबन भगत, राजेंद्र

प्रभाग क्रमांक १० मध्ये नवीन घंटागाडी दाखल; नगरसेविका अनिता वीर यांचे अभिनंदन!

आमदार विलास भुमरे यांच्या प्रयत्नातून मिळालेल्या घंटागाडीमुळे दारू सलाम वार्ड, सादात वार्डतील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– पैठण शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये नगरसेविका सौ. अनिता रमेश वीर यांच्या प्रयत्नातून नवीन घंटागाडी दाखल झाली आहे. या घंटागाडीचे विशेषतः मुस्लिम समाजाच्या वतीने स्वागत करून नगरसेविका अनिता वीर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील मुस्लिमबहुल वस्त्यांमध्ये काही महिन्यांपूर्वी घंटागाडी नियमितपणे येत होती. मात्र, त्यानंतर घंटागाडी येत नसल्याने नागरिकांना कचरा संकलनाच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. ही समस्या लक्षात घेऊन नगरसेविका सौ. अनिता रमेश वीर यांनी प्रयत्न केले. काही दिवसांपूर्वी आमदार विलास बापू भुमरे यांच्या प्रयत्नातून पैठण शहरासाठी १२ नवीन घंटागाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक घंटागाडी आता दारू सलाम वार्ड व सादात वाडा परिसरात सुरू झाली आहे. त्यामुळे परिसरातील कचरा संकलनाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असून नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.नागरिकांना स्वच्छ व सुंदर परिसर मिळण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल नगरसेविका सौ. अनिता रमेश वीर यांचे परिसरातील मुस्लिम समाजबांधव व नागरिकांकडून अभिनंदन होत आहे.



उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर द्या; अन्यथा कारखान्यांतून साखर बाहेर पडू देणार नाही!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न, आर्थिक अडचणी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय), मांजरी बुद्रुक येथे पार पडली. माजी नीती आयोग सदस्य तथा केंद्रीय उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी अभिजीत दादा पोटे यांनी शिवसेनेच्या वतीने सहभागी होत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि मागण्या आक्रमकपणे मांडल्या.

साखर उद्योगाची सद्यस्थिती, कारखान्यांसमोरील आर्थिक अडचणी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा दर आणि भविष्यातील धोरणात्मक उपाययोजना यांचा अभ्यास करून केंद्र शासनाला अहवाल सादर करण्याची



जबाबदारी या समितीवर आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत राज्यातील शेतकरी प्रतिनिधी, साखर कारखाना क्षेत्रातील पदाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या भूमिका मांडल्या.

बैठकीत अभिजीत पोटे यांनी उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ५० ते ५५ रुपये करावी, इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७५ रुपये निश्चित करावा, तसेच साखर कारखान्यांमधील वजनकाटे ऑनलाइन करून वजन प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशा प्रमुख मागण्यांवर जोर दिला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

यंदाची धनत्रयोदशी 'वनत्रयोदशी' म्हणून होणार साजरी



अहिल्यानगर- यंदाची धनत्रयोदशी 'वनत्रयोदशी' म्हणून साजरी करण्याचे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने केले आहे. शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी अहिल्यानगरच्या हुतात्मा स्मारकात दोन्ही संघटनांच्या वतीने वनत्रयोदशी साजरी होणार असून, तेथून 'हरित श्रीमंती'चा देशव्यापी संकल्प जाहीर केला जाणार आहे.सह्याद्रीची दाट जंगले, त्यांतून उगम पावणारे झरे, सुपीक माती आणि वन्यजीवांची विविधता ही देशाची 'हरित श्रीमंती' आहे. पाणी, अन्न आणि निवारा देणारी ही नैसर्गिक संपदा जपणे ही माणसासह जीवसृष्टीच्या अस्तित्वाची अट आहे, अशी भूमिका संघटनांनी मांडली. सह्याद्रीतील नैसर्गिक जंगलांची तोड थांबवून पाणलोट क्षेत्रे, झरे आणि वन्यजीवांचे अधिवास सुरक्षित करावेत, अशी मागणी त्यांनी केली.महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी १५ डिसेंबर २०२६ पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यापूर्वी नामंजूर झालेल्या दाव्यांचीही फेरतपासणी केली जाणार आहे. संबंधित दावेदारांना नामंजुरीची कारणे समजावून सांगून अतिरिक्त पुरावे आणि आपले म्हणणे सादर करण्याची संधी देण्याचे निर्देश आहेत. अशा दावेदारांनी जुना आदेश व उपलब्ध पुरावे घेऊन संबंधित वनहक्क समितीकडे फेरतपासणीसाठी लेखी पाठपुरावा करावा, असे आवाहन संघटनांनी केले.वनहक्क अधिनियम, २००६ अंतर्गत पात्र अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी कुटुंबांच्या ताब्यातील, निवासासाठी किंवा उपजीविकेच्या शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या वनजमिनीवरील हक्कांना कायद्यानुसार मान्यता द्यावी. प्रलंबित दाव्यांवर वेळेत निर्णय घेऊन दावे मंजूर झालेल्या कुटुंबांना वनहक्कपत्रे आणि संबंधित महसुली अभिलेख द्यावेत, अशी मागणी दोन्ही संघटनांनी केली.मानवी कृतींमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्याच पार्श्वभूमीवर, विषुववृत्तीय प्रशांत महासागरात नैसर्गिकरीत्या उद्भवणारा 'एल निनो' भारताच्या मान्सूनच्या पावसावर परिणाम करू शकतो. वाढती उष्णता आणि पावसातील अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी जंगले व जलस्रोतांचे रक्षण तातडीचे आहे, असे संघटनांनी म्हंटले आहे. ग्रामसभा, वननिवासी, शेतकरी आणि नागरिकांनी या दिवाळीत आपापल्या गावात वनत्रयोदशी साजरी करावी, स्थानिक जंगले व जलस्रोत जपण्याचा संकल्प करावा आणि पात्र वनहक्क दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी एकत्र पाठपुरावा करावा, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने केले आहे. या अभियानासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, ज्ञानेश्वर चांदणे, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

हभप यादवराव खेडकर यांचे निधन

अहिल्यानगर- येथील भुतकरवाडीतील रहिवासी यादवराव खेडकर यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले,यादवराव प्रथम हातमाग, पवारलूम चालवायचे नंतर त्यांनी लालटाकी येथे जय लक्ष्मी टी सेंटर सुरू केले, १९९० मध्ये हरिहर महाराजांनी त्यांना अनुग्रह दिला तेव्हापासून त्यांनी दरवर्षी पंढरपूर,पैठण व आळंदी पायी वारी ३० वर्षे केली तसेच ते दिंडी पूर्वी सेवेकरी म्हणून आठ दिवस पडेल ते काम करत असेल, लालटाकी व भुतकरवाडी परिसरात ते सर्व परिचित होते,त्यांच्यामागे गणपत,दत्तात्रय,विनायक ही ३ मुले.नातवंडे .पणतू आहेत.अध्यात्मातील चांगल्या व्यक्तीच्या निधनाने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे



साकळाई उपसा सिंचन योजनेचे भूमिपूजन करून तातडीने काम सुरू करा!

दुष्काळामुळे शेतकरी व पशुपालक अडचणीत; चारा छावण्या, चारा डेपो किंवा अनुदान जाहीर करण्याची मागणी

१२ नोव्हेंबरपासून हिवरे झरे येथे जनआंदोलन व रास्ता रोको करण्याचा साकळाई योजना कृती समितीचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारने मंजुरी देऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप योजनेच्या कामाचे भूमिपूजन झालेले नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत भूमिपूजन करण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार तातडीने भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. तसेच दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी व पशुपालकांना दिलासा देण्यासाठी चारा छावण्या, चारा डेपो सुरू करावेत किंवा पशुधन वाचविण्यासाठी तातडीने अनुदान जाहीर करावे, अशी मागणी साकळाई योजना कृती समितीने केली आहे.

या मागण्यांसाठी गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून हिवरे झरे, ता. नगर येथे जनआंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, गोवर्धन कार्ले, नारायण रोडे, सोमनाथ घाडगे आदी उपस्थित होते.

साकळाई उपसा जलसिंचन योजना जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असून,



या योजनेमुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. या योजनेला मंजुरी मिळावी, यासाठी साकळाई योजना कृती समितीच्या वतीने यापूर्वी जनआंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने योजनेला मंजुरी दिली. मात्र, मंजुरी मिळून सहा महिने उलटले तरी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत योजनेचे भूमिपूजन करण्यात येईल, असे जाहीर केले होते. त्यामुळे लाभधारक शेतकरी भूमिपूजनाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, शासनदरबारी अद्याप कोणत्याही ठोस हालचाली दिसून येत नसल्याची नाराजी कृती समितीने निवेदनात व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार योजनेचे भूमिपूजन लवकरात लवकर जाहीर करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी जोरदार मागणी लाभधारक शेतकरी कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

भूमिपूजनाची तारीख जाहीर न झाल्यास १२ नोव्हेंबर २०२६ पासून पुन्हा जनआंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनाची सुरुवात हिवरे झरे, ता. नगर, जि. अहिल्यानगर येथून रास्ता रोको करून करण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळी ९ वाजता आंदोलन सुरू होईल. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही समितीने दिला आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पाण्याअभावी शेतीचे नुकसान होत असताना पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. पशुपालनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर जनावरांचे संगोपन करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करावेत अथवा पशुधन वाचविण्यासाठी आवश्यक अनुदान जाहीर करावे, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

शेतकरी आणि पशुपालकांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घेऊन आर्थिक मदतीचा हात द्यावा. साकळाई योजनेचे भूमिपूजन आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी चारा व अनुदानाच्या उपाययोजना या दोन्ही मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा नेत्याच्या विरोधात नसून, केवळ शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी असल्याचे कृती समितीने निवेदनात स्पष्ट केले आहे.

डोंगरगण न्यू इंग्लिश स्कुल शाळेचा ग्रामसेवकाने पाणीपुरवठा केला बंद

विद्यार्थ्यांचे हाल,शिक्षकांनी आमदार अक्षय कर्डिले यांच्याकडे मागितली दाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे समोर आले आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवका कडून शाळेचा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून,हा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करावा,अशी मागणी शाळेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आमदार अक्षय कर्डिले यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सुमारे २८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये बहुतांश विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर व विटभट्टी कामगार कुटुंबातील आहेत. पिण्याचे पाणी बंद करण्याचा असा कुठलाही नियम नाही.

शाळेला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता.मात्र, ग्रामपंचायतीने हा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.शाळेतील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची सुविधा बंद करणे योग्य नसल्याचे शिक्षकांनी निवेदनात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांना शुद्ध व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक असून, ग्रामपंचायतीने शाळेचा पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आमदार अक्षय कर्डिले यांनी या प्रश्नात लक्ष घालून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाला सूचना द्याव्यात, अशी अपेक्षा शाळा प्रशासनाने व्यक्त केली आहे. आता आमदार अक्षय कर्डिले या निवेदनाची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा मार्गी लावतात, याकडे डोंगरगण ग्रामस्थ व पालकांचे लक्ष लागले आहे.पाणी पुरवठा पूर्ववत सुरु करण्यास सांगू असे आश्वासन आ कर्डीले यांनी दिले आहे

शहर स्वच्छता कार्यात नागरिकांचे सहकार्य अपेक्षित : स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल

स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फाउंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महानगरपालिका प्रशासनाकडून शहरात आरोग्य व स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. मात्र महापालिकेच्या दैनंदिन स्वच्छता कार्यामध्ये व उपक्रमांमध्ये नागरिकांचे सहकार्य व सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याचे प्रतिपादन रेल्वे स्टेशन परिसरातील स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल यांनी केले.

स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप राजेंद्र सामल यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संजीवनी कॉलनीचे जेष्ठ सदस्य उद्योजक अशोक चुडीवाल, स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनचे महावीर ललवाणी, अभय ललवाणी, ऋषिकेश ललवाणी, मुकादम योगेश वाघमारे, विजय भोसले व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अभय ललवाणी म्हणाले की, महापालिका स्वच्छता कर्मचारी दररोज शहर परिसर स्वच्छ ठेवण्याचे कार्य करीत असतात. त्यामुळे आपल्या सर्वांचे आरोग्य निरोगी राहते. दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दरवर्षी स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात येते. त्यामुळे महापालिका प्रशासन व नागरिक यांच्यात समन्वय निर्माण होतो. नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात सुलभता येते. ललवाणी परिवाराच्यावतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम हा कौतुकास्पद असल्याचे यावेळी स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करा

महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देवून नगरसेवक रवींद्र बारस्कर यांची मागणी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर व उपनगरांतील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शहरातील सर्व प्रभागांमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून ज्या भागांत तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे, त्या ठिकाणी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करून पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी महापौर ज्योतीताई गाडे आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेतही नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी शहर व उपनगरांतील तीव्र पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. पाणीटंचाईचा गांभीर्याने विचार करून नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात म्हटले आहे की, अल्प पर्जन्यमानामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, विविध परिसरांत तीव्र पाणीटंचाईची समस्या उद्भवत आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने धरणे, तलाव आणि इतर जलस्रोतांमधील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. परिणामी, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापराच्या पाण्यासाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अहिल्यानगर शहरातदेखील पाणीटंचाईची समस्या गंभीर होत असून, विविध भागांतील नागरिकांकडून पुरेशा प्रमाणात आणि नियमित पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या कालावधीत पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. पाणीपुरवठा अनियमित झाल्यास सर्वसामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागते.

त्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व प्रभागांतील पाणीपुरवठ्याचा आढावा घेऊन योग्य नियोजन करावे. ज्या भागांत पाणीटंचाई अधिक आहे, अशा परिसरांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून सर्व भागांना योग्य प्रमाणात पाणी मिळेल, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी बारस्कर यांनी केली आहे.

पाणीटंचाईवर उपाययोजना करताना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी, पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच बंद असलेल्या विहिरी आणि बोअरवेलची पाहणी करून त्यांचा वापर करण्याबाबत कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय ज्या भागांत नियमित पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही, तेथे पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था निर्माण करावी. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेण्याची गरज असल्याचे बारस्कर यांनी म्हटले आहे.

अहिल्यानगर शहर व उपनगरांतील सद्यस्थितीतील पाणीटंचाईचा गांभीर्याने विचार करून सर्व प्रभागांमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे, तीव्र टंचाई असलेल्या भागांत तातडीने टँकर सुरू करावेत आणि नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक सूचना देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी केली आहे.

राज्यस्तरीय हिंदी निबंध स्पर्धेत पाअुलबुधे महाविद्यालयाचे यश

। मनाली पवार प्रथम, शुभांगी जाधव यांना चौथा क्रमांक । राज्यस्तरावर घवघवीत यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने आयोजित पश्चिम भारत हिंदी राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहिल्यानगर येथील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मनाली संजय पवार हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर शुभांगी दत्तात्रेय जाधव हिने चतुर्थ क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची राज्यस्तरावर छाप उमटवली.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने पश्चिम भारत हिंदी राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हिंदी भाषेतील अभिव्यक्ती कौशल्य, विचारांची मांडणी, भाषेवरील प्रभुत्व आणि लेखनातील सर्जनशीलता या गुणांचा कस या स्पर्धेत लागला. त्यामध्ये मनाली संजय पवार हिने आपल्या प्रभावी लेखनाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. तर शुभांगी दत्तात्रेय जाधव हिने चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयामध्ये विविध शैक्षणिक व साहित्यिक उपक्रम राबविले जातात. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपले भाषा कौशल्य, विचारक्षमता आणि सर्जनशीलता सिद्ध करण्याची संधी मिळते.


या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनयनाथ पाअुलबुधे, संस्थेचे संचालक साई पाअुलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तज्ज्ञ संचालक डॉ. रेखा राणी खुराणा, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा डावरे, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, डी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. सविता सानप, डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

चेहऱ्याच्या गंभीर फ्रॅक्चरवर तीन यशस्वी शस्त्रक्रिया; डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये रुग्णांना नवा दिलासा!

जबडा, गाल आणि चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर आधुनिक तंत्राद्वारे उपचार; आयुष्मान भारत योजनेतून तिन्ही रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– चेहऱ्याला झालेली गंभीर दुखापत ही केवळ बाह्य स्वरूपापुरती मर्यादित नसते. अशा दुखापतींमुळे बोलणे, अन्न चावणे, जबड्याची हालचाल आणि चेहऱ्याच्या नैसर्गिक रचनेवरही परिणाम होऊ शकतो. अशाच गुंतागुंतीच्या दुखापतींवर मात करण्यासाठी डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील प्लास्टिक सर्जरी विभागाने तीन रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. विशेष म्हणजे, या तिन्ही रुग्णांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारांचा लाभ मिळाला.



या तीन रुग्णांच्या दुखापतींचे स्वरूप वेगवेगळे होते. पहिल्या रुग्णाच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूच्या वरच्या जबड्याचे (), खालच्या जबड्याचे आणि गालाच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले होते. दुसऱ्या रुग्णाच्या खालच्या जबड्याचे, तर तिसऱ्या रुग्णाच्या गालाच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले होते. प्रत्येक रुग्णाच्या दुखापतीचे स्वरूप, हाडांची स्थिती आणि संभाव्य गुंतागुंत लक्षात घेऊन डॉक्टरांनी स्वतंत्र शस्त्रक्रिया नियोजन केले.

चेहऱ्याचा नैसर्गिक आकार आणि जबड्याची कार्यक्षमता टिकवण्यावर भर

या शस्त्रक्रियांसाठी या आधुनिक पद्धतीचा वापर करण्यात आला. या तंत्रामध्ये फ्रॅक्चर झालेली हाडे योग्य स्थितीत आणून विशेष वैद्यकीय प्लेट्स आणि स्क्रूच्या साहाय्याने स्थिर केली जातात. यामुळे हाडांची योग्य जुळणी होण्यास मदत होते. चेहऱ्याची नैसर्गिक रचना, दातांची जुळणी आणि जबड्याची कार्यक्षमता पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने ही उपचारपद्धती महत्त्वाची ठरते.

प्लास्टिक सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. अजित काळे, तसेच डॉ. धीरज जुमडे आणि डॉ. अश्विन वानखेडे यांनी या शस्त्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. चेहऱ्याच्या विविध हाडांना झालेल्या दुखापतींवर अचूक उपचार करताना वैद्यकीय कौशल्यासोबतच सूक्ष्म शस्त्रक्रिया नियोजनाची आवश्यकता असते. डॉक्टरांच्या समन्वयातून तिन्ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या.

महागड्या उपचारांचा आर्थिक भार टळला

चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर शस्त्रक्रिया करताना विशेष उपकरणे, वैद्यकीय साहित्य आणि तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असते. मात्र, या तिन्ही रुग्णांवर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे रुग्णांना आवश्यक आधुनिक उपचार मिळण्याबरोबरच उपचारांच्या खर्चातूनही दिलासा मिळाला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने आणि वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात विशेष वैद्यकीय सेवांच्या बळकटीकरणावर भर दिला जात आहे.

चेहऱ्याच्या गंभीर दुखापतींवर अत्याधुनिक शस्त्रक्रिया सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे ही अहिल्यानगर आणि परिसरातील रुग्णांसाठी दिलासादायक बाब आहे. प्लास्टिक सर्जरी विभागाच्या या यशस्वी शस्त्रक्रियांमुळे गुंतागुंतीच्या चेहऱ्याच्या फ्रॅक्चरवरील तज्ज्ञ उपचार रुग्णालयात उपलब्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे

दिवाळीत सेवाप्रीतच्या महिलांनी उजळविले बालभवन; इन्व्हर्टरच्या भेटीतून विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अंधार केला दूर!

वीज गेल्यानंतरही विद्यार्थ्यांचा अभ्यास थांबणार नाही; स्नेहालयच्या उत्कर्ष बालभवनला इन्व्हर्टरची भेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि नव्या आशेचा सण! या सणाचा खरा अर्थ केवळ दिव्यांची रोषणाई करण्यात नसून, गरजूंच्या आयुष्यात आनंदाचा आणि आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आहे, याची प्रचिती सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या महिलांनी घडवून आणली. कोठला येथील स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवनमध्ये दिवाळी साजरी करताना फाऊंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजेची जाणीव ठेवून इन्व्हर्टर भेट देण्यात आला. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचा अभ्यास थांबू नये, त्यांना अंधारामुळे शिक्षण सोडून घरी परतावे लागू नये, या संवेदनशील भावनेतून देण्यात आलेल्या या भेटीमुळे बालभवनमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग अधिक प्रकाशमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दिवाळीच्या निमित्ताने सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या सदस्यांनी बालभवनमधील विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण साजरे केले. यावेळी सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख डॉ. सिमरन वधवा, खजिनदार अर्चना खंडेलवाल यांच्यासह दीपिका चोहितरमानी, शेरी धुप्पड, कल्पना जामगावकर, डॉ. प्रिया मुनोत, वीणा जगताप, अनु थापर, गगन बग्गा, लीना दंडवाणी, जया मेघानी, निशी गुजराती, स्वीटी गुप्ता आणि टीना कुमार उपस्थित होत्या.

बालभवनच्या रुबीना शेख यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. बालभवनमधील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी आणि त्यांच्या गरजांची माहिती त्यांनी दिली. पूजा काळे यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. यास्मिन शेख यांनी स्वागत केले.



यावेळी जागृती ओबेरॉय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनात मोठे ध्येय ठेवण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, जीवनात स्वतःला कधीही कमी समजू नका. आपण कोणत्या परिस्थितीत जन्माला आलो, यापेक्षा त्या परिस्थितीतून स्वतःला कसे घडवतो, याला अधिक महत्त्व आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी तिच्याशी धैर्याने सामना करून आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर प्रत्येकाला यश मिळवता येते, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

डॉ. सिमरन वधवा यांनी गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना जीवनमूल्यांची शिकवण दिली. जीवनात चांगले घडण्यासाठी संयम ठेवणे आवश्यक आहे. अपेक्षित यश मिळण्यास उशीर झाला, तरी निराश होऊ नका. कधी कधी चांगल्या गोष्टी घडण्यासाठी वेळ द्यावा लागतो. त्यामुळे सातत्याने प्रयत्न करत राहा, असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी पणती सजवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कल्पना जामगावकर आणि गगन बग्गा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पणत्या सजविण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध रंग, आकर्षक कलाकुसर आणि कल्पकतेचा सुरेख संगम साधत सुंदर पणत्या तयार केल्या. त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट कलाकृतींची निवड करून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

या संपूर्ण उपक्रमातील सर्वाधिक महत्त्वाचा भाग म्हणजे सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनने उत्कर्ष बालभवनला दिलेला इन्व्हर्टरचा सहयोग. अनेकदा वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे संध्याकाळच्या वेळी अभ्यासासाठी बालभवनमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना अंधारामुळे शिक्षण थांबवून घरी परतावे लागत होते. ही अडचण लक्षात घेऊन फाऊंडेशनच्या महिलांनी केवळ सणानिमित्त भेटवस्तू देण्यापुरता विचार न करता बालभवनची प्रत्यक्ष गरज ओळखली आणि इन्व्हर्टर उपलब्ध करून दिला.

दिवाळीचा 'बोनस' एकत्र भेटले दोन विषारी घोणस



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नगर तालुक्यातील मराठवाडी येथे एकाच वेळी दोन अत्यंत विषारी घोणस साप आढळून आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दिवाळीच्या काळात दोन घोणस साप आढळल्याने नागरिकांमध्ये 'दिवाळी बोनस दोन घोणस' अशी चर्चा रंगली.

घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोन्ही घोणस सापांना अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर या दोन्ही सापांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

सध्या पावसाळ्यानंतरचे वातावरण आणि वाढते तापमान यामुळे साप मानवी वस्तीकडे येण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी नागरिकांना सापांबाबत महत्त्वाचे आवाहन केले आहे.

साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून निसर्गाचा समतोल राखण्यात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे साप दिसल्यास घाबरून जाऊ नये किंवा त्याला मारण्याचा प्रयत्न करू नये. सापापासून सुरक्षित अंतर ठेवावे आणि तातडीने प्रशिक्षित सर्पमित्र किंवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले.

घोणससारखा अत्यंत विषारी साप मानवी वस्तीत आढळल्यास नागरिकांनी स्वतः हून त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नये. घटनास्थळी गर्दी करू नये, परिसर सुरक्षित ठेवावा आणि प्रशिक्षित सर्पमित्रांना पाचारण करावे, असे आवाहन कृष्णा पाटील बेरड यांनी केले आहे.

जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने नितीन भंडारी यांचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नितीन भंडारी यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीबद्दल भंडारी यांचा जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मंडळाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा, मनोज गुंदेचा, प्रमोद डागा, अमित गांधी, मर्चंटस बँकेचे कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी आदी उपस्थित होते.

शैलेश मुनोत म्हणाले, मर्चंटस बँक ही सहकारी बँकिंग क्षेत्रातील प्रतिष्ठित आणि नावाजलेली बँक आहे. संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी अतिशय दूरदृष्टीने आदर्श कार्यपद्धती निर्माण करून बँकेला नेहमीच प्रगतीपथावर नेले आहे. सुवर्णमहोत्सवी टप्पा ओलांडताना बँकेने नेहमीच सभासद, ग्राहकांना अत्याधुनिक व तत्पर बँकिंग सेवा दिली आहे. बँकेच्या यशात कुशल व अभ्यासू अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. नितीन भंडारी सुमारे ४५ वर्षांपासून बँकेत निष्ठेने सेवा देत आहेत. माझे वडील स्व.सुरेश मुनोत यांच्या चेअरमनपदाच्या कार्यकाळातही भंडारी प्रशासनात होते. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा बँकेला निश्चितच फायदा होईल. आमच्या मंडळाचे बहुतांश सभासद मर्चंटस बँकेचे सभासद, खातेदार आहेत. भंडारी यांच्या रूपाने एक शिस्तबद्ध अधिकारी सीईओ पदावर विराजमान झाला याचा सर्वांनाच आनंद वाटतो.

नितीन भंडारी म्हणाले, मर्चंटस बँकेत संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करताना ४५ वर्षात खूप शिकायला मिळाले. काळानुरूप बदल अंगिकारत जास्तीत जास्त चांगली बँकिग सेवा देण्यावर कायम भर दिला जातो. एका प्रतिष्ठित आणि विश्वसनीय बँकेत प्रशासकीय प्रमुख म्हणून संधी मिळाली हे माझ्यासाठी खूप आनंददायी आहे. जय आनंद महावीर युवक मंडळाच्या सामाजिक कार्याचा अनेक वर्षांपासून परिचय आहे. हे मंडळ सुद्धा रौप्य महोत्सव साजरा करत आहे.

मंडळाने केलेला सन्मान चांगल्या कामासाठी ऊर्जा देणारा आहे. शेवटी सत्येन मुथा यांनी आभार मानले.

महिलांनी तयार केलेली उत्पादने खातेदारांपर्यंत

दीपावलीत वृद्धेश्वर मल्टीस्टेटचे महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अनेक संस्थांद्वारे दीपावलीनिमित्त ग्राहक, खातेदार, सभासद वा आप्तस्वकियांना मिठाई वा भेटवस्तू दिल्या जातात. मात्र, येथील वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट या शेतकरी आणि महिला केंद्रीत आर्थिक संस्थेने महिला सबलीकरण-सक्षमीकरण आणि स्थानिक महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने खाद्योत्सवांतर्गत महिलांनी तयार केलेली अनेकविध उत्पादने आपल्या खातेदारांना व ग्राहकांना दिवाळी भेट म्हणून पाठवली आहेत. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठलराव वाडगे, चेअरमन सायली वाडगे, व्हाईस चेअरमन अनिल गावडे व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना वाडगे-गावडे यांनी यासाठी पुढाकार घेतला.

या उपक्रमाविषयी माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना वाडगे-गावडे यांनी सांगितले की, वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट संस्थेद्वारे दरवर्षी दिवाळीनिमित्त सहकार्यांना, खातेदारांना आणि हितचिंतकांना कॉर्पोरेट गिफ्टिंग केले जाते. पण यावर्षी भेटवस्तू केवळ देण्यापुरती मर्यादित न राहता, त्यामागे चांगल्या सामाजिक उद्देशाची जोड असावी, या हेतूने स्थानिक महिला उद्योजिका आणि महिला बचत गटांकडून दिवाळी गिफ्टिंगसाठी उत्पादने मागवली. अनेक महिलांनी अनेकविध उत्पादने सादर केली. यातील स्नेहल धर्माधिकारी व सहकारी महिलांची न्याहरी शिदोरी ही आरोग्यदायी उत्पादने निवडली गेली. यात थालीपीठ भाजणी, मूग भजी, मूग डोसा, ढोकळा मिक्स, धिरडे मिक्स अशा विविध उत्पादनांचा समावेश आहे.

विविध धान्ये आणि कडधान्यांपासून तयार होणार्या या पदार्थांमुळे आहारात वैविध्य आणण्याचाही संदेश या उपक्रमातून दिला गेला आहे व त्याचा वापर करणारांना विशेष आरोग्यदायी आहाराचा आनंद यातून मिळणार आहे, असेही मेघना गावडे यांनी सांगितले. महत्त्वाचे म्हणजे ही उत्पादने करण्यासाठी महिलांनी केलेली मेहनत व पारंपरिक



खाद्यसंस्कृतीशी जोडलेली उत्पादने यांचा विचार करताना ही महिला उद्योजिकांच्या मेहनतीला दिलेली दाद, त्यांच्या व्यवसायाला दिलेली बाजारपेठ व त्यांच्या स्वावलंबनाला दिलेला छोटासा हातभार आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. अशा छोट्या-छोट्या निर्णयांमधून महिला उद्योजकांना मोठ्या बाजारपेठेशी जोडू शकतो आणि महिला सबलीकरण हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणू शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. महिला सबलीकरणासोबत आरोग्यदायी दिवाळीचा संदेश यंदा वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटने दिला असून, स्थानिक महिला उद्योजिकांच्या पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देताना कृतीशील समाजकारण केल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. महिला सबलीकरण हा केवळ भाषणांमधून मांडण्याचा विषय नसून तो आपल्या दैनंदिन निर्णयांमधून आणि कृतीतून प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. स्थानिक उत्पादक, महिला बचत गट आणि महिला उद्योजिकांच्या कष्टांनाही सन्मान मिळायला हवा. कारण, एका महिलेचा व्यवसाय सक्षम झाला, तर तिच्या कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीला आणि समाजाच्या विकासालाही हातभार लागतो, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. महिला उद्योजिकांच्या स्वप्नांना बळ देणारी आणि आरोग्यदायी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देणारी यंदाची दिवाळी ठरावी, हाच संदेश वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटच्या या अभिनव उपक्रमातून देण्यात आला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

(पान १ वरून)

ऊस दराबाबत कारखान्यांनी आठवडाभरात निर्णय घ्यावा - ना.विखे पाटील

मागण्या जाणून घेतल्या. ऊस दर आणि शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत कारखाना व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घ्यावी. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नांवर चर्चा करावी आणि ९ नोव्हेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.राज्य सहकारी बँकेच्या धोरणाप्रमाणे जिल्हा सहकारी बँकेचे धोरण निश्चित होईल.सध्या जिल्हा बँकेवर प्रशासक असल्याने कारखान्यांना मदत करण्याबाबत त्यांच्याशी यासंदर्भात बोलणार असल्याचे मंत्र्यांनी सांगितले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून कारखान्यांतील वजनकाट्यांच्या अचूकतेबाबत उपस्थित करण्यात आलेली मागणी मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकारी यांच्या संयुक्त पथकामार्फत सर्व संबंधित कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी करण्यात येणार आहे. ही तपासणी पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी शेतकरी किंवा शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींही पथकासोबत उपस्थित राहतील. त्यामुळे वजन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होणार आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगामादरम्यान येणाऱ्या अडचणी आणि तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राधान्याने हाताळून त्यावर योग्य तोडगा काढण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यात समन्वय राखून प्रश्न सोडविण्याची भूमिका शासनाची आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांचा सकारात्मक विचार करून सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने मार्ग काढण्यात येईल, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमहापौर धनंजय जाधव, प्रादेशिक उपसंचालक(साखर) संजय गोंदे यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कपाशीच्या शेतात गांजाची लागवड!

किमतीचा गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी तात्याराम भिकाजी गावडे याला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण जगदाळे करत आहेत.

अंमली पदार्थ बाळगणाऱ्या किंवा विक्री करणाऱ्या व्यक्तींबाबत कोणालाही माहिती असल्यास त्यांनी ती तातडीने पोलिसांना द्यावी. माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पथकात यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत मिरजगाव पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, पोलीस उपनिरीक्षक किरण जगदाळे, पोलीस अंमलदार गणेश ठोंबरे, सुनील खैरे, गोकुळ पळसे, अमित बरडे, स्वाती जगधने, पोलीस वाहन चालक राहुल सपट तसेच कर्जत येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे मनोज लातुरकर आणि सागर जंगम या पथकाने सहभाग घेतला.

केडगावच्या पाणीप्रश्नासाठी नगरसेवक मनोज कोतकर यांनी धरले अधिकाऱ्यांचे पाय

मात्र, दुष्काळसदृश परिस्थितीमुळे चारा आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता कमी होत असल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने केडगाव उपनगरात चारा छावण्या सुरू करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करून शेतकरी व पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी मनोज कोतकर यांनी केली. केडगावमधील नागरिकांचा पाणीप्रश्न आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घेऊन तातडीने मार्गी लावावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

जिल्हा बँकेचा फक्त उत्तरेसाठी वापर करतात तर चित्र वेगळे असते

खासदार निलेश लंके म्हणाले, जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणूकीत प्रचंड पैशाचा वापर करण्यात आला. मतदारांवर दबाव टाकण्यात आला. धमक्या देण्यात आल्या. मतदारावर मतदान करताना पाळत ठेवण्यात आली. प्रशासनाचाही वापर केली. शिवाय उत्तरेत सर्वाधिक मतदान आहे. तेच ते लोक बँकेत राजकारण करुन शेतकऱ्यांची बँक म्हणतात, पण आपल्या कारखान्यासाठी वापर करतात. अनेक मतदारांना दबावापोटी इच्छा असूनही आम्हाला मतदान करता आले नाही, जर मतदारांना मोकळ्या मताने मतदान करु दिले असते तर निकालाचे चित्र वेगळे असते.

जिल्हा बँकेचे विभाजन करा

ॲड. शिवाजीराव काकडे म्हणाले, जिल्हा सहकारी बँकेला ठरावीक कारखानदार मक्तेदारी समजून सत्ता मिळण्यासाठी सोयरेधायरे व सर्वच बाबीचा वापर करतात. यंदा आम्ही विस्थापीत लोकांसाठी निवडणूक लढवली. संगमनेर, कोपरगावात सर्वाधिक मते होती. आम्हाला तेथे कसलाही आधार नव्हता. दाबदडपशाही केली तराही आम्हाला एकून मताच्या ४५ टक्के मते मिळाली. निवडणूका लढवायला, मैदान म्हणून दक्षिणेचा वापर करतात. पण जेव्हा निधी द्यायची वेळ येते तेव्हा बँक असो की अन्य बाब सगळे पैसे उत्तरेत नेतात. विस्थापीत, सामान्य लोकांनी बँकेत येऊ नये म्हणून हे लोक प्रयत्नशील असतात. जिल्हा बँकेत दक्षिणेला कधी न्याय मिळाला नाही. त्यामुळे जिल्हा बँकेचे विभाजन केले पाहिजे अशी आमची मागणी आहे.